*Review Of Research*
Vol. 2, Issue. 11, Aug. 2013
**ISSN:-2249-894X**

ORIGINAL ARTICLE

# ''राजर्षी शाहूमहाराजांनी धार्मिक शोषणाच्या विरोधात केलेले सामाजिक कार्य''

***प्रा.कदम संभाजी धोंडीराम***

बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी, ता.पलूस जि. सांगली

***प्रस्तावना :–***

राजर्षी शाहूमहाराज हे महाराष्ट्राला मिळालेले एक मौलीक रत्न होते.साधी रहाणी व उच्च विचार सरणी,समाज प्रबोधनाची तळमळ वंचित ,दु:खितांचे दु:खाचे निराकरण करणारा राजा स्व:ता राजा असून साधी जीवनशैलीचा अवलंब केल्यामुळे त्यांना लोकांनी आपले मानले.कारण त्यांच्याकडे मानवता होती.सतत ते लोकांच्या भावनांचा कदर करत असत. त्यांच्याकडे असणा–या चांगल्या गुणांमुळे ते लोकत्वापर्यंत पोहचले म्हणून खांडेकर म्हणतात " मानवावर केवळ मानव म्हणून उत्कट प्रेम करणारे मन लोकोत्तर होते.

अन्यायाविरूद्ध झगडताना ते ते वज्र कठोर बनत.पण वंचित व दु:खितांच्या दर्शनाने ते कुसुमकोमल होत.पृथ्वीच्या पाठीवर अनेक सम्राट झाले असतील राजाधिराज म्हणून गाजून गेले असतील पण समाजाच्या तळाच्या मानवतेवर माणूस म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फार थोडे झाले असतील राजर्षी शाहूमहाराज हे त्यापैकी एक होत. सामाजिक क्रांतीचे त्यांचे स्वप्न एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आजच्या वादळी जीवनात आपल्याला वाट दाखवायल पुर्णपणे समर्थ आहे शाहूनी राजांचे अधिकार गाजवले नाहीत.म्हणून कदाचित त्यांच्या राजकिय कारकिर्दित त्यांना अनेक वादळांना तोंड दयावे लागले होते.ज्यावेळी शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर हिंदू धर्मास जी ग्लानी आलेली होती,समाजात जातीभेद,अंध:श्रद्धा,बुवाबाजी,जादुटोणा यांना उत आलेला होता.या सर्वांमुळे समाज भरडून निघाला होता.त्यावेळी त्यांनी वेळोवेळी संघर्ष केला त्याला धीराने तोंड दिले आहे.त्यांनी आपले मोठेपणा समाजासमोर कधीच आणला नाही.म्हणून या कार्याबद्दल पु. ल. देशपांडे म्हणतात–शाहूमहाराज हा किती मोठा राजा होता त्यापेक्षा किती मोठा माणूस होता, हे मनाला आनंद देणारे आहे.

वर्ण वर्चस्वावविरूद्ध वेदोक्त प्रकरणाच्या निमितांने त्यांनी जे बंड उभारले त्याच्या मुळाशी स्वत:च्या अपमानाच भावनेपेक्षा मूलत: सामाजिक अन्यायाची चीड होती.समाजातील तळातल्या माणसाला न्याय देण्याचा हा विचार माणूसकीचा गहिवर असल्याशिवाय जन्म घेत नाही आणि म्हणून समाजप्रबोधनाचे क्रांतीकारक कार्य करण्यात ते अग्रदूत ठरले.महाराजांच्या मनात असलेली ही सामाजिक सुधारणा ही सर्व व्यापी स्वरूपाची होती तत्कालीन संर्घषाच्या काळी ते कोणाला एखाद्या जमातीचे द्वेशी वाटले असतील.परंतू त्यांचा राज्यकारभार व जीवनाचा तपशील पाहिला तर या थोर माणसांने कधी कोणचा द्वेष केला नाही.समाजप्रबोधनाचे त्यांनी नुसते चिंतन केले नाही तर हातात असलेल्या सतेचा वापर जाणीवपूर्वक व निर्धाराने सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी केला ही अतिशय मौलिक व लक्षणीय गोष्ट आहे.भारतात तेव्हाही व्यक्तिश: अनेक लोकोंच्या हाती सत्ता होती. परंतू त्या सत्तेचा वापर ध्येयवादी दृष्टीने करून समाजामध्ये मौलीक बदल करण्याचा प्रयत्न विसाव्या शतकाच्या प्रारंभी करणारा राजर्षी छ्त्रपती शाहू महाराज हा एकूलता एक राजा होता.

जगी या धन्य तुम्ही बोला ।
शाहू आमुचा झाला ।। धृ ।।
धर्मास येते ग्लानी
जगाची झाली हानी
शाहू येई जन्माला
उजाळा देई धर्माला ।। १।।

वर म्हटल्याप्रमाणे समाजातील धर्माला ग्लानी आलेली होती भटा ब्राम्हणांनी आपल्या स्वार्थासाठी

**Title:** *''राजर्षी शाहूमहाराजांनी धार्मिक शोषणाच्या विरोधात केलेले सामाजिक कार्य''* **Source: Review of Research [2249-894X]** *प्रा.कदम संभाजी धोंडीराम* **yr:2013 vol:2 iss:11**

धर्माला आपल्या मर्जीप्रमाणे वागायाला,हाताळाया सुरूवात केली होती.समाजात धर्माच्या नावाखाली लोकांची लुट चालू होती.आम्ही म्हणजे देव व आम्हालाच देवाची पूजा देवकार्य करण्याचा अधिकार आहे आणि आम्हास वगळता गतप्रभ होतील तारांगणे ही कविने लिहिलेली ओळीने समाजाला धमकावत होते.समाजात सर्वत्र लुटालुट चालू होती जातीभेद,स्त्रीभेद,अस्पृश्यता,अन्याय ,अत्याचार बुवा बाजी या गोष्टीनी समाजाची लूट चालली होती राजांच्या जन्माने म्हणजेच त्यांनी कोल्हापूरच्या गादीची सूत्रे हाती घेतली आणि परिवर्तनाला सुरूवात केली यावेळी खरी प्रबोधनाची पहाट झाली.

भेदाभेद मोडीला
दलितोद्धार करविला
गरीबा हात लाविला
सुखाचा मार्ग दावियला ॥ २ ॥

समाजामध्ये स्वत:ला शहाणे म्हणविणारे अनेकजन होते.पण जातीयता कायमची घालवण्यास कोणी तयार नाहीत ही समाजाची गत होती राजांनी फुलेंचा आदर्श समोर ठेवून भेदाभेद नष्ट करण्यासाठी पाऊल उचलले कोल्हापूरात गंगाराम कांबळे या महार व्यक्तिला हॉटेल काढून दिले व स्वत: त्या हॉटेलात जाऊन चहा पीत असत. जंगलात शिकारीला गेल्यावर एके ठिकाणी रामोशांची वस्ती होती त्यातील एका रामोशाला बोलावून भोजनाची व्यवस्था करायला लावून आल्या सहाकरी मित्रांना भोजनाचा आस्वाद घेवू दिला.डॉ. बाबासाहेबांच्या कर्तृत्वाने ते भारावून गेले होते त्यांनी बाबासाहेबांना पुढील शिक्षणास प्रोत्साहन व मदत केली. गरीबांना सुखाचा मार्ग दाखविला.

शाहूमहाराजांच्या स्नानाच्यावेळी राजदरबारातील विधी करणारा राजोपाध्याय पुराणतील वेद व मंत्र म्हणत असतो हे राजांना कळाले तेव्हा या उद्धट राजोपाध्याय याने राजांना शुद्र मानले हे मंत्र उच्चारू नये ही ताकीद दिली असता त्याने वेदोक्त मंत्र उच्चाराया नकार देताच राजांनी त्याला नोकरीवरून काढून टाकले त्याला संस्थानाकडून जी जमिन जुमला,संपत्ती मिळत होती ती बंद केली.राजोपाध्याय याचे नाव सरदारांच्या यादीतून कमी करण्यात आले.याचा राग येवून राजांवर त्याने खटला चालवून त्यांचे शोषण केले सर्व अनिष्ठ गोष्टींचा कर्दन काळ असणा—या व समाज प्रबोधनाचा वसा घेतलेल्या राजांचे शोषण ब्राम्हण समाजाने चालू ठेवले होते.ब्राम्हण समाजाने राजोपाध्याध्यांना पाठींबा दिला ब्राम्हणंची एकजूट करून राजांचे शोषण अधिकच तीव्र केले.या संस्थानातील शासकीय कर्मचारी,व अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते,धार्मिक नेते, विद्वत वर्ग,यांचा सहभाग होता. त्यामुळे संस्थानात जातीय संघर्ष, सामाजिक तणाव,धार्मिक बहिष्कार,राजकिय दबाव,विद्वेशपूर्ण प्रचार यासारख्या असाधारण गोष्टी घडल्या राजोपाध्यायाची चूक असताना ती कबूल न करता उलट राजांच्या आदेशाविद्ध पवित्रा घेतल्याने प्रकरण अधिकच चिघळले ब्राम्हण समाज, वर्तमानपत्रांचे संपादक मान्यवर कायदेपंडीत,प्रभावी साहित्यिकांनी पाठिंबा दिल्याने तो प्रश्न सामाजिक झाला.

अवैद्य जमिनी वैद्य करा ब्रिटीश सरकारने हस्तक्षेप करावा ,संस्थानाची जाहिर चौकशी करावी,अशा मागण्या करून ब्राम्हणांनी सामान्य माणसांचा छळ करावा तसा छळ राजांचा मांडला होता.त्यांनी धार्मिक कार्यावर बंदी,बहिष्कार टाकला,पूजा बंदी,मंदिर व्रतिबंध,जलप्रतिबंध,अत्यंसंस्कार प्रतिबंध एवढे करून थांबले नाहीत तर, राजे बाहेर निघाले की, ब्राम्हण आशीर्वाद देत तो बंद केला,त्यांना मंदिर प्रवेश नाकारला सत्कार समारंभात अडथळे ,दैवी प्रकोपाची भीती राजवाडाभर पसरविली,क्षत्रियांबद्दल आक्षेप घेतले.सार्वजनिक आंदोलन केले,त्यावेळच्या ब्राम्हणांनी चालविलेल्या वृतपत्रातून या आंदोलनाचा प्रचार केला जात होता.जेवढया पद्धतीने त्रास देता येईल तेवढा त्रास दिला होता.अशा प्रकारे वेदोक्त प्रकरणाचा त्रास राजांना झाला.

धर्म ढोंगी स्वार्थांध
धुर्त छळती जनतेस
शाहु धावोनिया आला
स्वार्था घातिला आळा ॥ ३ ॥

शाहू राजे स्वत: देवाचे दर्शन घ्यावयाचे त्यांची देवाधर्मावर श्रद्धा होती ते दररोज घाटावर स्नानास जात त्यांच्याबरोबर राज पुरोहितांही जात होता मात्र तो गार पाण्याने स्नान करून वेद पठण करावे लागत. पावसाळा व थंडीच्या दिवसात हे गार पाण्याने स्नान करायला तयार होत नसत. प्रसंगी स्नान न करताच पुजाविधी करत होते तरी ही आपणच श्रेष्ठत्वाचा तोरा मिरवत होता धर्माचे ढोंग रचून राजांसह जनतेला लुबाडत होते.या सर्वांवर राजांनी उपाय शोधला.प्रत्येक समाजाने आपापला धर्मविधी करणारा शोधला उदा. जैनांचा उपाध्याय, लिंगायतांचा जंगम तसा ब्राम्हणेतरांसाठी प्रत्येक किंवा सर्वांसाठी असा एक धर्मविधी करणारा का असू नये असा विचार राजांनी करून १९१३ साली जी सत्यशोधकी शाळा काढली त्या शाळेचे संचालक श्री ढोणे या धनगर समाजातील कार्यकर्त्याकडे हे धर्मविधीचे काम सोपविले.विशेष म्हणजे गुजरीतेतील काही ब्राम्हणेतर मंडळी या प्रशिक्षणासाठी येऊन त्यांनी आपापल्या गावात वेदोक्त पद्धतीने विधीला सुरूवात केली. त्यामुळे भटजींचे प्रस्थ कमी झाले. लग्न जर भटाशिवाय केले तर त्याचा दंड भटाला दयावा. असा पिर्णय न्या. रानडे यांनी दिला. आजही ब्राम्हणेत्तर समाजामध्ये जैनधर्म सोडल्यास इतर सर्व लोक धार्मिक कार्यात भटजींचा सहभाग घेतात म्हणजेच राजांने इतका

लढा देऊनसुद्धा महाराज अपयशी झाले म्हणायचे काय?

ब्राम्हणांनी समाजाला वेगवेगळया मार्गाने लुटायला सुरूवात केली होती. अडाणी शेतकरी कुटुंबाला लुटायला सुरूवात केली.यावर उपाय म्हणून महाराजांनी या भटा, ब्राम्हणांना शह देण्यासाठी अनेक प्रयत्न करूनही राजांना अपयश येत होते.राजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. आजपर्यंत आपल्या अडाणी जनतेची फसवणूक या ब्राम्हणी समाजाने केली या सर्वातून समाजाला बाहेर काढायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे ओळखले होते म्हणून हा सगळा व्याप महाराजांनी केला. त्याला प्रतिसाद ही मिळत गेला. बहुजनांची मुले शिकून मोठया पदावर जावीत ,मग त्यांच्यापाठोपाठ इतर मुल शाळा शिकतील व समाजाची प्रगती होईल हा हेतू मनात ठेवून सर्व जाती धर्मातील मुलांच्यासाठी वेगवेळी वसतीगृहे बांधली ,शिष्यवृत्या देवून शिकण्यास प्रोत्साहित केले.ज्यांनी गुणवत्ता प्राप्त केली त्यांना नोक—यात प्राधान्य दिले.आणि आरक्षणही ठेवले. जेव्हा साथीच्या रोगांचा फैलाव होत होता तेव्हा राजांने आरोग्य अधिका—यांची संख्या वाढविली.दुष्काळ ,भूकबळी यासारख्या समस्याना समर्थपणे तोंड दिले.कलाप्रेमी,नाटयप्रेमी,शाहीर,तमासगीर, कवी, दलितांचा उद्धारक, फासेपारध्यांना माणसात आणणारा,शेती व सहकाराची जाणीव असणारा,पर्यावरणाचा समतोल साधणारा वर्णवर्चस्वावर प्रहार करणारा,समाजप्रबोधन करणारा,सामाजिक क्रांतीची ज्योत तेवत ठेवणारा,कलाटणी देणारा,लोकांचा राजा,लोककल्याणकारी राजा,लोककल्याणासाठी झटणारा राजा,वसतीगृहांचा निर्माता,दलितांचा राजा,केशराचा मळा फुलविणारा राजा,सामाजिक लोकशाहीचे पुरस्कर्ते,आधुनिक समाजक्रांतीचे जनक,क्षात्रजगत्‌गुंरू पीठाचा निर्माता,हिंदू मुस्लीम ऐक्य व सौख्य निर्माण करणारा,भारतीय राज्यघटनेचा आदर करणारा,आपल्यासारख्या राजे व सरंजामदार,उमराव,यांची मैत्रिपूर्ण भावाने वागणारा,वंचितांचा वाली,कारभार यंत्रणा,सरकारी नोकरवर्ग,यांना चांगली वागणूक देणारा,शिस्तिचे स्वत: पालन करणारा,सत्यशोधक चळवळीला पुढे नेणारा,सशस्त्र राजा हा समाज सेवक म्हणणे उचित ठरेल .

समाजात बोकाळलेली अंध:श्रद्धा घालवून दयायची होती,समाज परिवर्तन करतांना त्यांनी बहुजन समाजाची सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक,व सांस्कृतिक पातळी उंचवायची होती.याबरोबरच अस्पृश्य समाजाला बंधुत्वाच्या भावनेने जवळ केले.त्यामुळे बहुजन समाजला जबरदस्त धक्का बसला असला तरी सामाजिक क्षेत्रात परिवर्तन करतांना एक गाव एक पाणवठा ही संकल्पना अंमलात आणण्यासाठी अस्पृश्य स्त्रीच्या घागरीतील पाणी पिवून प्रत्यक्ष कृती केली.विधवा केशवपन बंदी,विध्वा पुनर्विवाहाला चालना,मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविली,आंतरजातिय विवाहाला मान्यता दिली. शिक्षणात ,नोकरीत, धार्मिक कार्यातील ब्राम्हणांची मिरासदारी संपविली.ब्राम्हणांची शिक्षणातील मक्तेदारी संपविली आणि बहुजनांना शिक्षणाची द्वारे खुली केली यावर आपले विचार व्यक्त करतांना महाराज म्हणतात "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे.शिक्षणांशिवाय कोणत्याही कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही.शिक्षणाशिवाय अज्ञानात बुडून गेलेल्या देशात कधीही उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधिही निर्माण होणार नाहीत.ते शिक्षणाशिवाय गतकाल म्हणजे अंधार मानत होते.मनू आणि मनुवादी शास्त्रज्ञानी ज्ञानाचे दरवाजे ब्राम्हणेत्तेरांना बंद केल्यामुळेवेदांचा अर्थ व धर्मग्रंथ लोकांना समजू शकत नव्हते.हे समजण्यासाठी समाज सुशिक्षित व सुसंस्कृत करावयाचा होता.म्हणून महाराजांनी शिक्षणाची गंगा गरीबांच्या झोपडीपर्यंत नेवून त्यांना माणसात आणण्याचे महान कार्य राजांनी केले होते.अशा प्रकारे समाज प्रबोधनाबरोबर समाजाची उन्नती करणारा बहुजनांचा वाली ब्राम्हणांच्या रोषाला बळी पडला.ब्राम्हणांनी अनेक प्रकारांनी छळले त्यांचे शोषण या समाजाने केले आहे.या सर्वातून बहुजन समाजाची सुटका व्हावी म्हणून त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

***संदर्भ***

१. संपादक, डॉ जाधव रमेश—राजर्षी शाहू गौरव ग्रंथ महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तिसरी आवृत्ती २०१६
२. संपादक, जयसिंगराव पवार , विजयराव मा. शिंदे —विजयी मराठा —राजर्षी शाहू दर्शन, विजयी मराठा प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती,२०११
३. डॉ. संभाजी खराट —सत्यशोधक चळवळ, वाटचाल आणि चिकित्सा, प्रतिमा प्रकाशन पुणे, जुलै २००५
४. डॉ. जयसिंगराव पवार—श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, प्रकाशक, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती,२००८.
५. श्री. ए.के घोरपडे—राजर्षी शाहू छत्रपती —चरित्र व कार्य, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे २८ मार्च १९९८.